# प्रकरण सहावे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

# प्रकरण सहावे

## सारांश, निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना.

६.२ संशोधनाचा सारांश.

६.३ निष्कर्ष.

अ) प्रतिसादक प्राचार्यांविषयी निष्कर्ष

ब) अध्यापक विद्यालयांच्या व्यवस्थापना विषयी निष्कर्ष.

क) भौतिक सुविधांविषयी निष्कर्ष.

ड) शिक्षकांच्या प्रशासनाविषयी निष्कर्ष.

इ) शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी निष्कर्ष.

ई) विद्यार्थी प्रशासनाविषयी निष्कर्ष.

उ) कार्यालयीन कामकाज व दप्तराविषयी निष्कर्ष.

ऊ) आर्थिक प्रशासनाविषयी निष्कर्ष.

६.४ शिफारशी.

अ) प्रतिसादक प्राचार्यांविषयी शिफारशी.

ब) अध्यापक विद्यालयांच्या व्यवस्थापना विषयी शिफारशी.

क) भौतिक सुविधांविषयी शिफारशी.

ड) शिक्षकांच्या प्रशासनाविषयी शिफारशी

इ) शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी शिफारशी

ई) विद्यार्थी प्रशासना विषयी शिफारशी.

उ) कार्यालयीन कामकाज व दप्तराविषयी शिफारशी.

ऊ) आर्थिक प्रशासनाविषयी शिफारशी.

६.५ पुढील संशोधनासाठी विषय.

१. "महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रशासनाचा चिकीत्सक अभ्यास."

२. "सैनिकी विद्यालयांच्या व्यवस्थापनामध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास."

३. " महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांचा प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

# प्रकरण सहावे.

## सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी.

### ६.१ प्रस्तावना.

प्रकरण १ ते ४ यामध्ये संशोधनाबाबतची दिशा आणि पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. प्रकरण क्रमांक ५ मध्ये संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलीत केलेली होती. या माहितीचे अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

१. प्राचार्यांना दिलेल्या प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

२. शिक्षकांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

३. शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

४. भेटी व पाहणीद्वारे मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

अशा टप्प्यातून प्रकरण ५ मध्ये मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

प्रकरण १ ते ५ मधून प्राप्त झालेल्या माहितीची विश्वसनियता निरनिराळया घटकांच्या परस्पर पूरक माहितीमुळे निश्चित झालेली आहे. मिळालेल्या या माहितीच्या आधारे प्रकरण ६ मध्ये निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. त्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. निष्कर्ष आणि शिफारशी नंतर अभ्यासकाने पुढील संशोधनासाठी कांही विषयावर प्रकाश टाकण्याची आवश्यकता वाटल्याने ते घटक नमूद केलेले आहेत.

### ६.२ संशोधनाचा सारांश.

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी "सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निश्चित केला. या संशोधनासाठी संशोधकाने चार उद्दिष्टे निश्चित केलेली होती. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा संशोधकाने ठरविल्या होत्या. सदर संशोधनाचे महत्व आणि गरज यांचा अभ्यास प्रकरण एक मध्ये संशोधकाने केलेला आहे.

प्रकरण दोन मध्ये संशोधन विषयाच्या संबंधित साहित्याचा व संबंधित संशोधनाचा अभ्यास संशोधकाने केला. प्रस्तुत संशोधन हे इतर संशोधनापेक्षा वेगळे आहे. अशी खात्री करून घेतली की या विषयावरती पूर्वी संशोधन झालेले नसल्याने हे संशोधन संशोधकास महत्वाचे वाटले.

प्रकरण तीन मध्ये अध्यापक विद्यालयाचे महत्व, यात सेवापूर्व प्रशिक्षण, क्षमता, बांधिलकी, कृति कार्य सेवांतर्गत प्रशिक्षण, N.P.E., जिल्हा प्रशिक्षण संस्था N.C.T.E. यांचा अभ्यास याच प्रकरणामध्ये केला.

प्रकरण चार मध्ये संशोधनासाठी प्रथमत: संशोधकाने संशोधनाची पद्धती निश्चित केली, ही पद्धती सर्वेक्षण पद्धती होय. संशोधनाची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणे या साधनांचा अवलंब केला.

सोलापूर जिल्ह्यातील १७ अध्यापक विद्यालयांच्या प्राचार्यांना प्रश्नावली देण्यात आली. १७ प्रायार्चांनी प्रश्नावलीतील माहिती भरून दिली. प्रश्नावलीतील माहितीची सत्यता पडताळण्यासाठी संशोधकाने ३४ शिक्षकांच्या, एक शिक्षणाधिकारी व एक उपशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या. १७ अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देवून निरीक्षण करून प्रश्नावलीतील व मुलाखतीत मिळालेल्या माहितीची खात्री करून घेतली. याच प्रकरणात संशोधकाने संशोधनाची कार्यपद्धती निश्चित केली होती.

प्रकरण पाच मध्ये प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पृथ:करण व अर्थनिर्वचन केले. या प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती, भेटी व निरीक्षणे या मधून मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन केले. आवश्यक त्या ठिकाणची माहिती कोष्टकांच्या सहाय्याने देण्यात आली. अशी एकूण या प्रकरणामध्ये ३८ कोष्टकात व १४ आलेखांच्या सहाय्याने माहिती देण्यात आली आहे. माहितीचे पृथ:करण खालील मुद्यानुसार केले आहे.

**❖ सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयातील प्राचार्याविषयी माहिती.**

३५.२९% प्राचार्य प्रशिक्षित पदवीधर होते तर ६४.७१% प्राचार्य पदव्युत्तर प्रशिक्षण घेतलेले होते. २३.५३% प्राचार्यांना एक वर्षापेक्षा कमी अनुभव होता. तर ७०.५९% प्राचार्यांना एक वर्ष

ते १० वर्षापर्यंत प्रशासनाचा अनुभव होता. ५.८८% प्राचार्यांना वीस वर्षापर्यंतच प्रशासनाचा अनुभव होता.

❖ **अध्यापक विद्यालयाच्या व्यवस्थापनाविषयी माहिती.**

५.८८% अध्यापक विद्यालये शासकीय अनुदानित अध्यापक विद्यालये होती. ३५.३0% अध्यापक विद्यालये खासगी संस्थांनी चालविलेली अनुदानित होती. ५८.८२% अध्यापक विद्यालये खासगी संस्थांची विनाअनुदानित तत्वावर चालविलेली होती. ७६.४७% अध्यापक विद्यालये मराठी माध्यमाची होती तर ५.८८% अध्यापक विद्यालये इंग्रजी माध्यमाची होती. ५.८८% विद्यालये कन्नड माध्यमाची तर ११.७७% विद्यालये उर्दू माध्यमाची होती. ९४.१२% अध्यापक विद्यालये खाजगी संस्थांची होती. ५.८८% विद्यालये महाराष्ट्र शासन संचलित होते.

❖ **भौतिक सुविधांविषयी माहिती.**

७0.५८% विद्यालयामध्ये स्वत:च्या पुरेशा इमारती होत्या. २९.४२% विद्यालयामध्ये स्वत:च्या पुरेशा इमारती नव्हत्या. ५८.८२% विद्यालयाची इमारत पक्क्या स्लॅबची होती. २९.४२% विद्यालयाच्या इमारती पत्र्याच्या छताच्या होत्या. ११.७६% विद्यालयाच्या इमारती कौलारू होत्या. ७0.५८% विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा होत्या. २९.४२% अध्यापक विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या. ६४.७0% विद्यालयामध्ये पुरसे फर्निचर होते. ३५.३0% विद्यालयामध्ये पुरेसे फर्निचर नव्हते. ५२.८२% विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये होती. ४१.१८% विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये नव्हती. ३८.८२% विद्यालयांमध्ये दूरदर्शन संच, रेडिओ, गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, पृथ्वीगोल, नकाशे व तक्ते, विज्ञानपेटी, प्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध होती. ४१.१८% विद्यालयांमध्ये दूरदर्शन संच, रेडिओ, गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, पृथ्वीगोल, नकाशे व तक्ते, विज्ञानपेटी, प्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध नव्हती.

७0.५८% विद्यालयांना स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण होते. २९.४२% अध्यापक विद्यालयांना स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण नव्हते. ५८.८२% विद्यालयांमध्ये खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध होते तर ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध नव्हते. ३५.३0% अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती. ६४.७0% अध्यापक विद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी

स्वतंत्र खोली नव्हती. ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ नव्हते. ५०.८२% विद्यालयातील ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ उपलब्ध असले तरी संदर्भ ग्रंथांची संख्या कमी होती. पुस्तकांची देवघेव करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथपाल नव्हता. ३५.३०% अध्यापक विद्यालयामध्ये प्रयोगशाळा होती. ६४.७०% अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा नव्हत्या. ४७.०६% अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते. ५२.९४% अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नव्हते.

**❖ शिक्षक प्रशासनासंबंधी माहिती.**

२८.८५% अध्यापक विद्यालयांमध्ये स्त्री शिक्षिका काम करीत होत्या. ७१.१५% अध्यापक विद्यालयात पुरूष शिक्षक काम करीत होते. ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये शासनाच्या कार्यभारा नुसार शिक्षकांची संख्या पुरेशी होती. ५८.८२% विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी नसल्यामुळे जादा काम करावे लागत होते. जादा काम केल्यामुळे शिक्षकांना थकवा येत होता. केलेले काम दर्जात्मक होत नव्हते. अभ्यास करण्यासाठी वेळ मिळत नव्हता. पाठाचे निरीक्षण दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे करावे लागत होते. इत्यादी समस्या येत होत्या. ७६.४७% अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक होते तर २३.५३% अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक नव्हते. ११.२६% विद्यालयांमध्ये एम.फिल व पी.एच.डी धारण करणारे प्रत्येकी एक शिक्षक होते तर ८८.२४% अध्यापक विद्यालयांमध्ये एम.फिल व पीएच.डी धारण करणारे शिक्षक नव्हते. २९.४२% विद्यालयातील शिक्षक अध्यापनाचे टाचण काढत होते तर ७०.८८% अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षक अध्यापनाचे टाचण काढीत नव्हते.२९.४२% प्राचार्य अध्यापनाचे महिन्यातून एका वेळी पाठाचे निरीक्षण केले होते. ७०.५८% अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांनी अध्यापनाचे निरीक्षण केले नव्हते. ३५.३०% विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत होते तर ६४.७०% विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत नव्हते. ५२.९४% विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला होता. ४७.०६% विद्यालयात अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला नव्हता. ४१.१८% विद्यालयातील सर्व शिक्षक विद्यालयाच्या आसपास गावातच रहात होते तर ५८.८२% विद्यालयातील सर्व शिक्षक गावाच्या आसपास गावात रहात नव्हते. ५२.९४% विद्यालयांमध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा

घेतली जात होती. ४७.0६ विद्यालयांमध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेतली नव्हती. ६४.७0% अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले जात होते. ३५.३0% विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले नव्हते. १00% अध्यापक विद्यालयातील शिक्षक सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेऊन दाखवित होते. सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही विद्यालयामध्ये दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरण केले जात नव्हते.

**❖ शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी माहिती.**

४१.१८% अनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे होते. ५८.८२% विनाअनुदानित विद्यालयापैकी ३५.३0% विद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी अपुरे होते. २३.५२% विद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी अजिबात नव्हते. म्हणून ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना वर्ग स्वच्छता, तासिक घंटा वाजविणे, प्रयोग साहित्याची मांडणी इत्यादी समस्या येत होत्या.

**❖ विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती.**

केंद्रीय पद्धतीने गुणवत्तेनुसार डी.एड प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांची निवड केली जात होती. २९.४२% विद्यालयांमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे भरणारे दिवस व स्थानिक नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण केले होते. ११.७६% विद्यालयांमध्ये स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण केला होता.५८.८२% विद्यालयांमध्ये जादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केला होता. ८८.२३% अध्यापक विद्यालयातील गैरहजर विद्यार्थ्यांना समज देण्यासाठी त्यांच्या पालकांना बोलाविले जात होते. ४७.0६% अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य गैरहजर विद्यार्थ्यांना दंड करीत होते. ३५.३0% प्राचार्य गैरहजर विद्यार्थ्यांकडून जादा अभ्यास करून घेत होते. ५८.८२% विद्यालयांमध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी होती. ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी नव्हती. त्यामुळे चेतक बदल, प्रबलन, फलक लेखन, विषय विवेचन इत्यादी कौशल्यामध्ये अडचणी येत होत्या. ५२.९४% विद्यालयांमध्ये सराव पाठांची संख्या पुरेशी होती. २९.४१% विद्यालयातील प्राचार्यांनी प्रथम वर्षासाठी सराव पाठांची संख्या पुरेशी नव्हती असे सांगितले. १७.६५% विद्यालयातील प्राचार्यांनी सराव पाठांची संख्या वाढविण्यास सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांना शैक्षणिक वर्ष ऑगस्ट ते जूलै असल्याने ऑक्टोबर मध्ये सहामाही परीक्षेमुळे

सरावपाठासाठी शाळा उपलब्ध होत नव्हत्या. प्रत्येक शिक्षक एकावेळी एका प्रशिक्षकाचे पाठ करीत नव्हते. कांही अध्यापक विद्यालयांमध्ये पाठाच्या सप्ताहाद्वारे पाठ संपविले जात होते. ५८.८२% विद्यालयातील प्राचार्यानी सांगितले की, शिक्षक साक्षरता अभियानात प्रत्यक्ष सहभागी होते.२९.४१% विद्यालयातील प्राचार्यानी सांगितले की, शिक्षक वस्तीशाळेतील शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचे काम करीत होते. ४१.१७% विद्यालयातील प्राचार्यानी सांगितले की शिक्षक कोणत्याच प्रकारची अवांतर कामे करीत नव्हते. ९४.११% अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यासाठी हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा इत्यादी वैयक्तिक उपक्रम घेतले होते. २९.४१% अध्यापक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्याची आरोग्य तपासणीची दक्षता घेतली जात होती असे सांगितले असले तरी आरोग्य तपासणीबद्दल बहुसंख्य विद्यालये काळजी घेत नव्हते.

❖ **कार्यालयीन कामकाज व दप्तर विषयी माहिती.**

८२.३६% विद्यालयांमध्ये दर तासाला हजेरी घेतली नव्हती. शिक्षकांच्या मुलाखतीवरून व चर्चे वरून कांही विद्यालयांमध्ये दर तासालाच काय पण दररोजची हजेरीही नियमित घेत नव्हती असे आढळून आले. ७०.५८% अध्यापक विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेट मस्टर ठेवले नव्हते. २९.४२% विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेट मस्टर ठेवले होते. ८८.२३% अध्यापक विद्यालयांमध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या होत्या. ६४.७०% विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या होत्या. ३५.३0% विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंदवह्या ठेवल्या नव्हत्या. ६४.७0% विद्यालयामध्ये शिक्षक पालक संघाची योजना राबविली नव्हती. ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवली होती तर ५८.८२% अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवली नव्हती. ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाच्या नियमानुसार पगार दिला जात नव्हता. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी टिकून रहात नव्हते. यामुळे सेवापुस्तके अद्ययावत नव्हती. ९0% अध्यापक विद्यालयांमध्ये विविध फाईल व रजिस्टर उपलब्ध होते.

❖ **आर्थिक प्रशासनाविषयी माहिती.**

५८.८२% विनाअनुदानित विद्यालयांचा खर्च विद्यार्थ्यांच्या फीतून भागत नव्हता. त्यामुळे विनाअनुदानित विद्यालयातील शिक्षकांना पूर्ण पगार दिले जात नव्हते. ५८.८२% विद्यालये विनाअनुदानित असल्यामुळे पाचव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांचे पगार देणे अशक्य होते. त्यामुळे उच्च अर्हता प्राप्त व अनुभवी शिक्षक मिळत नव्हते. याचा अध्यापनावर प्रतिकूल परिणाम झाला होता. ४१.१८% विद्यालयांमध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च वेतनेतर अनुदानामधून केला होता. ५८.८२% विद्यालयांमध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फीतून, संस्थेमार्फत व स्थानिक वर्गणीतून केला जात होता. ४१.१८% विद्यालयांना शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान पुरेसे होते. ५८.८२% विद्यालयांना शासनाकडून मिळणारे १२% वेतनेतर अनुदान मिळत नव्हते. ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना N.C.T.E चे norms प्रमाणे पात्र शिक्षक मिळत नव्हते. ९५% विद्यालयाच्या प्राचार्यांची मागणी विनाअनुदानित विद्यालये ही अनुदानित करावी, शिक्षकांचे वेतन सुधारीत वेतनानुसार देण्यात यावे अशी होती.

प्रकरण ६ मध्ये संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सूचविण्यात आले. संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत, प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती आणि भेटी व निरीक्षणे यावर आधारीत निष्कर्ष काढले. तसेच या निष्कर्षाच्या आधारे शिफारशी सूचविण्यात आल्या. संदर्भ सूची व परिशिष्टांची यादी संशोधकाने प्रकरण ६ नंतर दिलेली आहे. अशा रितीने प्रस्तुत संशोधनाचे कार्य संशोधकाने पूर्ण केले.

**६.३ निष्कर्ष.**

**अ. प्रतिसादक प्राचार्यांविषयी निष्कर्ष.**

१. ६४.७१% प्राचार्यांनी पदव्यूत्तर प्रशिक्षण घेतले होते तर ३५.२९% प्राचार्यांनी पदवी प्रशिक्षण घेतले होते. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली होती.

२. ७०.५९% प्राचार्य दहा वर्षापर्यंत अनुभव असणारे होते.

ब. अध्यापक विद्यालयांच्या व्यवस्थापनाविषयी निष्कर्ष.

३. एक (५.८८%) विद्यालय शासकीय अनुदानित होते. ६(३५.३०%) विद्यालये खासगी संस्थांची अनुदानित होती. १०(५८.८२%) विद्यालये खासगी संस्थांची विनाअनुदानित होती. यावरून सोलापूर जिल्ह्यात विनाअनुदानित अध्यापक विद्यालये अनुदानित अध्यापक विद्यालयांच्या तुलनेत जास्त होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती.

४. १३(७६.४७%) अध्यापक विद्यालये मराठी माध्यमाची होती तर प्रत्येकी एक (५.८८%) विद्यालये इंग्रजी व कन्नड माध्यमाची होती. २(११.७७%) विद्यालये उर्दू माध्यमाची होती. यावरून सोलापूर जिल्ह्यात इतर माध्यमापेक्षा मराठी माध्यमाची अध्यापक विद्यालये जास्त होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली होती.

५. १३(७६.४७%) अध्यापक विद्यालये मुलामुलींची (मिश्र) होती. प्रशिक्षणाच्या दृष्टीने ही खुपच चांगली गोष्ट होती.

६. १७ प्रतिसादक अध्यापक विद्यालयांपैकी १६(९४.१२%) विद्यालये खासगी संस्थांची होती. एक (५.८८%) विद्यालय महाराष्ट्र शासन संचलित होते. यावरून सोलापूर जिल्ह्यात खासगी संस्थांची विद्यालये महाराष्ट्र शासनाच्या विद्यालयांच्या तुलनेत जास्त होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती.

७. १०(५८.८२%) विद्यालयात ६० ते ८० विद्यार्थी संख्या होती तर ७(४१.१८%) विद्यालयात १३० ते १६० विद्यार्थी संख्या होती.

क. भौतिक सुविधांविषयी निष्कर्ष.

८. १२(७०.५८%) अध्यापक विद्यालयांना स्वत:ची पुरेशी इमारत होती. तर ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयांना स्वत:ची पुरेशी इमारत नव्हती. त्या विद्यालयातील विद्यार्थी त्यांच्याच मालकीच्या माध्यमिक शाळेच्या इमारतीत बसविले जात होते. ही सोय ओढून ताणून केल्यासारखी वाटते. त्यामुळे २९.४२% अध्यापक विद्यालयांची इमारतीची व्यवस्था ठिक नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने समाधानकारक वाटत नाही.

९. ११(६४.७0%) विद्यालयांमध्ये पुरेसे फर्निचर होते तर ६(३५.३0%) विद्यालयांमध्ये पुरेसे फर्निचर नसल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक यांना विविध समस्या येत होत्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

१0. ८(४७.0६%) विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नळयोजनेद्वारे केली होती. ६(३५.३0%) विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था हातपंपाद्वारे केली होती. ३(१७.६४%) विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. यावरून बहुतांश ८२.३६% अध्यापक विद्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होती. ही बाब समाधानकारक होती.

११. १0(५८.८२%) विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये होती. तर ७(४१.१८%) विद्यालयांमध्ये प्राचार्यासाठी स्वतंत्र कार्यालये नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती. एकत्र प्राचार्य व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बसत असतील तर इतर कर्मचा-यांवरती प्राचार्यांचा दबाव येतो व कार्यालयीन कामकाज चांगल्या प्रकारे होत नाही.

१२. ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली होती. तर ८ (४७.0६%) विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नव्हती. यावरून सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ४७.0६% अध्यापक विद्यालयात शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली व इतर सुखसोयी नव्हत्या. ही फारच वाईट गोष्ट होती.

१३. ८(४७.0६%) विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नव्हती. त्यामुळे शिक्षकांची बैठकीची व्यवस्था कार्यालयामध्ये केली होती. ही स्थिती योग्य नव्हती. कारण रिकाम्या तासिकेमध्ये शिक्षकांना विश्रांतीची गरज असते. पुढील तासाचा अभ्यास करण्याची गरज असते. त्यासाठी स्वतंत्र खोली पाहिजे.

१४. १0(५८.८२%) विद्यालयांमध्ये दूरदर्शन संच, रेडिओ, गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, पृथ्वी गोल, नकाशे व तक्ते, विज्ञान पेटी, फ्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध होती. ७ (४१.१८%) विद्यालयांमध्ये दूरदर्शन संच, रेडिओ, गणित पेटी, भूमिती पेटी, टेपरेकॉर्डर, पृथ्वी गोल, नकाशे व तक्ते, विज्ञान पेटी, फ्लॅनेल बोर्ड ही शैक्षणिक साधने उपलब्ध नव्हती. यावरून बहुसंख्य

५८.८२% अध्यापक विद्यालयांमध्ये शैक्षणिक साधने उपलब्ध होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य होती.

१५. १२ (७०.५८%) विद्यालयाला स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण होते. ५(२९.४२%) अध्यापक विद्यालयांना स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण नव्हते. त्यातील ३(१७.६४%) विद्यालये त्यांच्याच माध्यमिक विद्यालयातील क्रीडांगणाचाच वापर करीत होते तर २(११.७६%) विद्यालये त्याच संस्थेच्या महाविद्यालयीन क्रीडांगणाचा उपयोग करीत होते. यावरून सर्वच अध्यापक विद्यालयांना क्रीडांगणाची उपलब्धता कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्राप्त होती. ही बाब समाधानकारक होती.

१६. प्रशिक्षण काळात शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचेही प्रशिक्षण मिळणे आवश्यक असते पण १० (५८.८२%) विद्यालयांमध्ये खेळाचे पुरेसे साहित्य उपलब्ध असले तरी ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये हे साहित्य पुरेसे नव्हते. हे परिपूर्ण प्रशिक्षणाच्या दृष्टीने योग्य नव्हते.

१७. ६(३५.३०%) अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली होती. तर ११ (६४.७०%) अध्यापक विद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नव्हती. त्यातील ७(४१.१८%) विद्यालयांमध्ये वर्गातील कपाटात पुस्तके ठेवत होते. तर ४(२३.५२%) विद्यालयांमध्ये स्वतंत्र पुस्तकांचा संच विद्यार्थ्यांना घरीच दिली होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

१८. ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये पुरेसे ग्रंथ नव्हते. १०(५८.८२%) विद्यालयातील ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ उपलब्ध असले तरी संदर्भ ग्रंथांची संख्या कमी होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती. कारण पुस्तकांची देवघेव करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथपाल नव्हता. पुस्तके कमी असल्यामुळे विद्यार्थी अभ्यासात कच्चे होते. त्यांना अवांतर ज्ञान नव्हते. संदर्भ ग्रंथांची कमतरता असल्यामुळे शिक्षकांचे विषयज्ञान म्हणावे तेवढे योग्य नव्हते.

१९. ६(६४.७०%) अध्यापक विद्यालयांमध्ये प्रयोगशाळा नसल्यामुळे प्रयोगाची सोय वर्गात केली होती. ही बाब शास्त्र विषयाला महत्व देण्याच्या दृष्टीने अजिबात चांगली नव्हती. कारण प्रयोगशाळेत नाजूक साहित्य असतात. साहित्य संरक्षणासाठी स्वतंत्र खोलीची आवश्यक गरज असते.

२०. ८(४७.०६%) अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध होते तर ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयांमध्ये विज्ञान साहित्य उपलब्ध नसल्यामुळे त्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तक

वाचून प्रयोग समजत नव्हते. नवीन ज्ञानाचे आकलन होत नव्हते. त्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव होता. वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या बाबतीत ही बाब योग्य नव्हती.

**ड. शिक्षक प्रशासनासंबंधी निष्कर्ष.**

२१. २८.८५% स्त्री शिक्षिका काम करीत होत्या. ७१.१५% पुरूष शिक्षक काम करीत होते. यावरून सोलापूर जिल्ह्यात स्त्री शिक्षकांचे प्रमाण पुरूष शिक्षक संख्येपेक्षा कमी होते. ही बाब समाधानकारक नाही.

२२. ७(४१.१८%) अध्यापक विद्यालयांमध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी होती. ही विद्यालये अनुदानित होती. तर १०(५८.८२%) विद्यालयामध्ये शासनाच्या कार्यभारानुसार शिक्षकांची संख्या पुरेशी नसल्यामुळे त्या विद्यालयातील शिक्षक जादा काम करीत होते. जादा काम केल्यामुळे त्यांना थकवा येत होता. अध्यापनाचे केलेले काम दर्जात्मक होत नव्हते. त्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळत नव्हता. पाठाचे निरीक्षण दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे करीत होते. त्यामुळे पाठ निरीक्षण योग्य होत नव्हते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती.

२३. बहुसंख्य ७६.४७% अध्यापक विद्यालयांमध्ये आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक होते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती.

२४. २(११.७६%) विद्यालयांमध्ये एम.फिल व पीएच.डी धारण करणारे प्रत्येकी एक शिक्षक होते. तर १५(८८.२४%) अध्यापक विद्यालयांमध्ये एम.फिल व पीएच.डी धारण करणारे शिक्षक नव्हते. ही बाब समाधानकारक नाही कारण ज्या विद्यालयात उच्च शिक्षित शिक्षक असतात त्यांच्या ज्ञानाचा फायदा मिळेल परंतु हा फायदा या अध्यापक विद्यालयांना मिळत नव्हता.

२५. ५(२९.४२%) विद्यालयांमधील शिक्षक अध्यापनाचे टाचण काढत होते. तर १२ (७०.५८%) अध्यापक विद्यालयांमधील शिक्षक अध्यापनाचे टाचण काढत नव्हते. ही बाब शिक्षकांच्या विषय ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने चांगली नव्हती. कारण अध्यापनाचे टाचण काढल्यास अध्यापन प्रभावी होऊ शकते.

२६. ५(२९.४२%) विद्यालयातील प्राचार्य अध्यापनाचे महिन्यातून एकावेळी पाठाचे निरीक्षण करत होते. १२(७०.५८%) अध्यापक विद्यालयांमधील प्राचार्यांनी अध्यापनाचे निरीक्षण केले नव्हते. ही बाब समाधानकारक नाही.

२७. ६(३५.३०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत होते. ११(६४.७०%) अध्यापक विद्यालयातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत नव्हते. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली नव्हती.

२८. ९(५२.९४%) अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केले होते. तर ८ (४७.०६%) अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण केला नव्हता. ही विद्यालये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कोणतेच उपाय करीत नव्हते. ही फारच वाईट गोष्ट होती.

२९. ४१.१८% शिक्षक विद्यालयांच्या आसपास गावातच रहात होते. ५८.८२ % शिक्षक विद्यालयांच्या आसपास गावात रहात नसल्यामुळे मन:पूर्वक विद्यालयात काम न करणे, वेळेवर शाळेत न येणे, जादा तास न घेणे, अभ्यासेतर उपक्रमास गैरहजर रहाणें, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष न देणे इत्यादी समस्या येत होत्या. यावरून सोलापूर जिल्ह्यातील ५८.८२% अध्यापक विद्यालयातील अध्यापन फारसे समाधानकारक नव्हते.

३०. ९(५२.९४%) विद्यालयांमध्ये शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेत होते. मासिक सभेत परिपत्रक वाचन, दैनंदिन अध्यापन, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन इत्यादी विषयावरती चर्चा केली होती.

३१. सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ६४.७०% अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद इत्यादी मार्फत घेतले जाणाऱ्या प्रशिक्षणासाठी पाठविले होते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली होती.

३२. सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयातील शिक्षक सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेऊन दाखवित होते. ही बाब समाधानकारक होती.

३३. सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ. चित्रीकरण केले नव्हते. ही बाब समाधानकारक नाही.

३४. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये (३५.२९%) शिक्षक पदव्युत्तर होते तर (६४.७१%) शिक्षक आवश्यक पात्रताधारक होते. यावरून पदव्युत्तर शिक्षक संख्येपेक्षा आवश्यक पात्रताधारक शिक्षक जास्त होते. ही बाब समाधानकारक होती.

३५. कला शाखेच्या शिक्षकांपेक्षा विज्ञान शाखेचे शिक्षकांचे प्रमाण जास्त होते.

३६. २० ते ५०% शिक्षक अनक्रमे स्पष्टीकरण, कथन, प्रयोग दिग्दर्शन, चेतक बदल, फलक लेखन या कौशल्याचे दिग्दर्शन करीत होते. ही कौशल्ये जास्त महत्वाची असल्याने या कौशल्याकडे जास्त लक्ष देत होते. इतर कौशल्याचे मार्गदर्शन ही १० ते २०% शिक्षक करीत होते.

३७. बहुसंख्य शिक्षकांची मागणी अध्यापक विद्यालयाची वेळ सकाळी ७.१५ ते १२.३० असावी अशी होती. विद्यालये इतर शाळा महाविद्यालयांच्या बरोबरीने सुरू व्हावीत व सुट्टया त्यांच्या प्रमाणेच असाव्यात.

**इ. शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी निष्कर्ष.**

३८. ७(४१.१८%) अनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे होते. १० (५८.८२%) विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी पुरेसे नसल्यामुळे वर्ग स्वच्छता, तासिक घंटा वाजविणे, प्रयोग साहित्याची मांडणी, कार्यालयीन कागदपत्रांची पूर्तता इत्यादी बाबी वेळच्या वेळी होत नव्हते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

**ई. विद्यार्थी प्रशासनाविषयी निष्कर्ष.**

३९. केंद्रीय पद्धतीने गुणवत्तेनुसार डी.एड पदविका प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांची निवड केली होती.

४०. २९.४२% विद्यालयांमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे भरणारे दिवस व स्थानिक नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण केले होते. ११.७६% विद्यालयामध्ये स्वयंअध्ययन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण केले होते. ५८.८२% विद्यालयांमध्ये जादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केले होते. यावरून सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये कोणत्या ना कोणत्या मार्गाने अभ्यासक्रम पूर्ण केले होते.

४१. ८८.२३% अध्यापक विद्यालयांमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांना समज देण्यासाठी त्यांच्या पालकांना बोलाविले जात होते. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब चांगली होती.

४२. अध्यापक विद्यालयांमध्ये सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या पुरेशी नसल्यामुळे चेतक बदल, प्रबलन, फलक लेखन, विषय विवेचन इत्यादी कौशल्यामध्ये अडचणी येत होत्या.

४३. अध्यापक विद्यालयांमध्ये सराव पाठांची संख्या पुरेशी नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविध कमतरता होत्या. ५८.८२% अध्यापक विद्यालयात सराव पाठातील कमतरता कमी करण्यासाठी प्रयत्न केले होते ही बाब योग्य होती.

४४. ३५.३०% अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी पुरेशा शाळा मिळत नव्हत्या.

४५. सोलापूर जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांना शैक्षणिक वर्ष ऑगस्ट ते जूलै असल्याने ऑक्टोबर मध्ये सहामाही परीक्षेमुळे सरावपाठासाठी शाळा मिळत नव्हत्या. ही बाब समाधानकारक नाही.

४६. ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये पाठनिरीक्षणाचे कार्य समाधानकारक नव्हते.

४७. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये प्रत्येक शिक्षक एकाच वेळी एका प्रशिक्षकाचे पाठ निरीक्षण करीत नव्हते. कांही अध्यापक विद्यालयांमध्ये पाठाचा सप्ताह द्वारे पाठ संपविले होते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने चांगली नव्हती.

४८. जादा तास, वैयक्तिक मार्गदर्शन, स्वयं अध्ययन असे प्रयत्न कांही थोडया अध्यापक विद्यालयांमध्ये अंमलात आणले होते. विनाअनुदानित व ग्रामीण भागातील अध्यापक विद्यालयात अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, जादा तास घेणे या गोष्टी अभावानेच आढळल्या. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

४९. बहुतांश अध्यापक विद्यालयातील शिक्षक गट संमेलनात मार्गदर्शक, स्मार्ट पीटी साठी मार्गदर्शक, विविध क्रीडा स्पर्धेत पंच, प्रौढ शिक्षण प्रसार कृतीसत्रातून मार्गदर्शक, साक्षरता अभियानात प्रत्यक्ष सहभाग, वस्ती शाळा ट्रेनिंगचे काम, इत्यादी अवांतर कामे करीत होते.

५०. बहुसंख्य अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा इत्यादी वैयक्तिक उपक्रम घेतले होते.

५१. ५(२९.४१%) अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीची दक्षता घेतली जात होती असे सांगितले असले तरी संशोधकाला आरोग्य तपासणीबद्दल बहुसंख्य विद्यालये काळजी घेत नव्हते हे भेटी व चर्चेच्या वेळी दिसून आले. ही बाब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चांगली नव्हती.

**३. कार्यालयीन कामकाज व दप्तराविषयी निष्कर्ष.**

५२. बहुसंख्य (८२.३६%) विद्यालयामध्ये दरतासाला हजेरी घेतली जात नव्हती. शिक्षकांच्या मुलाखतीवरून व विद्यार्थ्यांच्या चर्चेवरून सोलापूर जिल्ह्यातील कांही विद्यालयामध्ये दर तासालाच काय पण दररोजची हजेरीही नियमित घेत नाहीत असे आढळून आले. त्या अध्यापक विद्यालयातून प्रशिक्षण समाधानकारक मिळत नसल्याचे दिसून आले.

५३. सोलापूर जिल्ह्यात (२९.४२%) अध्यापक विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेटमस्टर ठेवले होते. ७०.५८% अध्यापक विद्यालयांमध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी लेट मस्टर ठेवले नव्हते. ही बाब समाधानकारक नाही.

५४. सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ८८.२३% अध्यापक विद्यालयामध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या स्वतंत्र नोंदी ठेवल्या होत्या ही बाब समाधानकारक होती.

५५. ३५.३०% विद्यालयांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी नोंद वही ठेवली नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

५६. ६४.७०% विद्यालयांमध्ये दप्तरांची तपासणी करून तपासणी अधिका-यांनी सूचना दिलेल्या होत्य.

५७. सोलापूर जिल्ह्यातील ६४.७०% विद्यालयांमध्ये शिक्षक पालक संघाची योजना राबविली नव्हती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

५८. ४१.१८% अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवली होती. ५८.८२% अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाच्या

नियमाप्रमाणे पगार दिले नव्हते. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग टिकून रहात नव्हते. त्यामुळे विद्यालयातील कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्ययावत नव्हती.

५९. सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्य ८८.२३% अध्यापक विद्यालयांमध्ये विविध फाईल व रजिस्टर उपलब्ध होते. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य होती.

**ऊ. आर्थिक प्रशासनाविषयी निष्कर्ष.**

६०. सोलापूर जिल्ह्यातील ५८.८२% विद्यालये विनाअनुदानित असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार दिले नव्हते. त्यामुळे उच्च अर्हताप्राप्त व अनुभवी शिक्षक मिळत नव्हते. याचा अध्यापनावर प्रतिकूल परिणाम झाला होता. भौतिक सुविधा व साहित्य खरेदी करण्यास आर्थिक चणचण भासत होती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

६१. ४१.१८% विद्यालयांमध्ये वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च १२% वेतनेतर अनुदानतून केले होते. ५८.८२% विद्यालयांना १२% वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे वर्षभरातील किरकोळ दुरूस्तीचा खर्च शिक्षण फीतून, संस्थेमार्फत व स्थानिक वर्गणीतून केले होते.

६२. ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये एकही उच्च पात्रताधारक शिक्षक नव्हते. ही फारच वाईट गोष्ट होती

६३. ५८.८२% विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना N.C.T.E. चे norms प्रमाणे पात्र शिक्षक मिळत नव्हते. त्यामुळे शासनाने विद्यार्थी संख्या घटविली होती.

**❖ शिफारशी.**

**अ. प्रतिसादक प्राचार्याविषयी शिफारशी.**

1. N.C.E.T. च्या नियमानुसार सर्व अध्यापक विद्यालयातील प्राचार्य एम.ए.एम.एड. किंवा एम.एस्सी.एम.एड असावेत.

२. सर्व अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य जास्त अनुभवाचे असावेत.

**ब. अध्यापक विद्यालयांच्या व्यवस्थापनाविषयी शिफारशी.**

३. सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालये शासनाने अनुदानित करावीत.

४. सोलापूर जिल्ह्यातील ३५% अध्यापक विद्यालये मुलींची असावीत.

५. अध्यापक विद्यालयांच्या गुणवत्तेचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अध्यापक विद्यालये जास्त असावीत.

६. महाराष्ट्र शासनाने विनाअनुदानित विद्यालयांचे रूपांतर अनुदानित विद्यालयात करावे व विद्यार्थी संख्येत वाढ करण्यात यावी.

## ❖ भौतिक सुविधांविषयी शिफारशी.

७. प्रत्येक अध्यापक विद्यालयाला स्वता:ची स्वतंत्र व पुरेशी इमारत असावी.

८. अध्यापक विद्यालयांना संस्थेच्या मालकीची इमारत असावी.

९. ज्या अध्यापक विद्यालयांना पक्की स्लॅबच्या इमारती नाहीत त्या संस्थाचालकांनी निधी जमा करून इमारती बांधाव्या.

१०. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये वर्गखोल्या पुरेशा असाव्यात.

११. विनाअनुदानित विद्यालयांना अनुदान मिळत नसल्यामुळे संस्थाचालक इमारत बांधर्णाकडे दुर्लक्ष करत होते. या विद्यालयांनाही संस्थाचालकांनी पुरेशा वर्ग खोल्या बांधून द्याव्यात.

१२. प्रत्येक अध्यापक विद्यालयात पुरेसे फर्निचर असावे.

१३. सर्व अध्यापक विद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी.

१४. अध्यापक विद्यालयात प्राचार्यांचे कार्यालय स्वतंत्र असावे.

१५. अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली असावी.

१६. प्रत्येक अध्यापक विद्यालयात शैक्षणिक साधने असावीत.

१७. अध्यापक विद्यालयांना क्रीडांगण स्वत:च्या मालकीचे व पुरेसे असावे.

१८. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांकडे खेळाचे साहित्य नव्हते. खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी संस्थाचालकाने किंवा शासनाने प्रयत्न करून खेळाचे साहित्य उपलब्ध करावे.

१९. अध्यापक विद्यालयात ग्रंथालय खोली स्वतंत्र असावी व पुस्तकांचे वाटप करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथपाल असावा.

२०. अध्यापक विद्यालयातील ग्रंथालयामध्ये पुरेसे ग्रंथ असावेत.

२१. प्रत्येक अध्यापक विद्यालयात सुसज्ज प्रयोगशाळा असावी.

२२. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील प्रयोगशाळेत विज्ञान साहित्य उपलब्ध असावे.

**ड. शिक्षक प्रशासनासंबंधी शिफारशी.**

२३. मुलांचे आणि मुलींचे प्रमाण समान असल्याने व मुलगा व मुलगी समान हक्कामुळे प्रत्येक अध्यापक विद्यालयात स्त्री शिक्षिकांची संख्या समान असावी.

२४. शासनाच्या कार्यभारानुसार प्रत्येक अध्यापक विद्यालयात शिक्षकांची संख्या पुरेशी असावी.

२५. प्रत्येक अध्यापक विद्यालयात आवश्यक पात्रता धारण करणारे विषय शिक्षक असावेत.

२६. एम.फिल व पीएच.डी प्राप्त करण्यासाठी शासनाने व संस्थाचालकाने प्रयत्न करावेत. प्रत्येक विद्यालयात एम.फिल व पीएच.डी धारण करणारे शिक्षक असावेत.

२७. सर्व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी अध्यापनाचे टाचण काढावे.

२८. अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांनी शिक्षकांच्या अध्यापनाचे महिन्यातून दोन वेळा निरीक्षण करावे.

२९. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी शैक्षणिक साधने वापरावीत.

३०. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करावा.

३१. अध्यापक विद्यालयांनी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विविध उपाय करावेत.

३२. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी विद्यालयाच्या ठिकाणी रहावे.

३३. अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांनी परगावी राहण्यासाठी शिक्षकांना परवानगी देऊ नयें.

३४. प्रत्येक विद्यालयात शिक्षकांची दरमहा मासिक सभा घेण्यात यावी.

३५. सर्वच अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षकांच्या मासिक सभेत विविध विषयांसंबंधित चर्चा करण्यात यावी.

३६. अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी, उच्च शिक्षणासाठी संधी देण्यात यावी.

३७. सर्वच अध्यापक विद्यालयातील शिक्षकांचा प्रशिक्षणास उत्कृष्ट प्रतिसाद असावा.

३८. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी सराव पाठ सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शित पाठ घेऊन दाखवावेत.

३९. सर्वच अध्यापक विद्यालयांमध्ये दिग्दर्शित पाठाचे व्ही.डी.ओ चित्रीकरण करावे.

**इ. शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी शिफारशी.**

४०. प्रत्येक अध्यापक विद्यालयात शिक्षकेतर कर्मचा-यांची संख्या पुरेशी असावी.

४१. सर्वच अध्यापक विद्यालयामध्ये पुरेसे कर्मचारी असतील तर त्यांचा अध्यापनावर चांगला परिणाम होईल.

**ई. विद्यार्थी प्रशासनाविषयी शिफारशी.**

४२. केंद्रीय पद्धतीनुसार डी.एड प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांची निवड जूलै अखेर पर्यंत करावी.

४३. शिक्षकांनी विहीत अभ्यासक्रम विहीत कालावधीत पूर्ण करावा.

४४. अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची गैरहजेरी कमी करण्यासाठी पालकांशी संपर्क साधावा.

४५. सूक्ष्म अध्यापन पाठांची संख्या वाढवून पाठाची वेळ नऊ मिनिटे करावी.

४६. भाषेचा उच्चार, सभाधीटपणा, वर्गनियंत्रण, आत्मविश्वासाचा अभाव इत्यादी सराव पाठातील कमतरता विद्यार्थ्यांमधील दूर करण्यासाठी प्रथम वर्षासाठी सराव पाठांची संख्या वाढवावी.

४७. सरावपाठातील कमतरता दूर करण्यासाठी सर्व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांनी प्रयत्न करावेत.

४८. सर्व अध्यापक विद्यालयांना सराव पाठासाठी पुरेशा शाळा उपलब्ध असाव्यात.

४९. अध्यापक विद्यालयांचे शैक्षणिक वर्ष जून ते मे असावे.

५०. सर्व अध्यापक विद्यालयामध्ये योग्य पाठनिरीक्षण व्हावे.

५१. सर्व अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांनी एकावेळी एका प्रशिक्षकाच्या पाठाचे निरीक्षण करावे.

५२. बहुतेक अध्यापक विद्यालयात अभ्यासात मागे पडलेल्या मुलांसाठी प्रयत्न केले जातात, असे प्रयत्न सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये व्हावेत.

५३. अध्यापनावर चांगला परिणाम होण्यासाठी शासनाने शिक्षण विभागावर कोणतेही अवांतर काम सोपवू नये.

५४. अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक उपक्रमांचे आयोजन करावे. या उपक्रमासाठी संस्थाचालकांनी केवळ अर्थसहाय्य करून चालणार नाही. तर त्यासाठी साधनांची व पूरक बाबींची पूर्तता करावी.

५५. अध्यापक विद्यालयामधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किमान दोनवेळा केली जावी.

**३. कार्यालयीन कामकाज व दप्तराविषयी शिफारशी.**

५६. विद्यालयामध्ये दररोज दरतासाला हजेरी घेतल्यामुळे गैरहजर विद्यार्थी शोधून त्यांच्या पालकांशी संपर्क साधता येईल. दरतासाला हजेरी घेतल्याने वर्गाची (अध्यापक विद्यालयाची) उपस्थिती वाढेल.

५७. प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये उशिरा येणा-या शिक्षकांसाठी 'लेट मस्टर' ठेवावेत व उशिरा येणा-या शिक्षकांवर योग्य कार्यवाही करावी.

५८. प्रत्येक अध्यापक विद्यालयामध्ये पुस्तके, मासिके व परिपत्रकांच्या नोंदी ठेवाव्यात.

५९. तपासणी अधिका-यांनी वर्षातून प्रत्येक विद्यालयाला दोन ते तीन भेटी द्याव्यात व शिक्षक आणि प्राचार्य यांना मार्गदर्शन करावे.

६०. प्रत्येक अध्यापक विद्यालयात वर्षातून दोनदा तपासणी अधिका-यांकडून दप्तर तपासले जावे.

६१. सर्व अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक पालकाची संघाची स्थापना करून संघाच्या सभेच्या अहवालाच्या नोंदी ठेवाव्यात.

६२. प्रत्येक अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवण्यात यावी.

६३. प्रत्येक अध्यापक विद्यालयांमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे पगार देऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवण्यात यावीत.

६४. प्रत्येक अध्यापक विद्यालयात फाईल व रजिस्टर उपलब्ध असावे.

**ऊ. आर्थिक प्रशासनाविषयी शिफारशी.**

६५. शासनाने विनाअनुदानित विद्यालयांचा खर्च व्यवस्थित भागविण्यासाठी शिक्षण फीमध्ये वाढ करावी.

६६. विनाअनुदानित विद्यालयांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने व संस्थाचालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

६७. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील अध्यापनावर होणारा प्रतिकूल परिणाम दूर करण्यासाठी शिक्षण फी वाढवून उच्च अर्हता प्राप्त व अनुभवी शिक्षकांची नेमणूक करावी.

६८. प्रत्येक अध्यापक विद्यालयांना अद्ययावत करण्यासाठी १२% ऐवजी २०% वेतनेतर अनुदान शासनाने द्यावे.

६९. प्रत्येक विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये उच्च पात्रताधारक शिक्षक असावेत.

७०. प्रत्येक विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामधील शिक्षकांना शासनाच्या नियमानुसार वेतन द्यावे.

## ६.५ पुढील संशोधनासाठी विषय.

आपल्या देशातील शिक्षण पद्धतीमध्ये प्राथमिक शिक्षणाचे स्थान महत्वाचे आहे. आजच्या आधुनिक, वैज्ञानिक व स्पर्धायुक्त जीवनाचा पाया प्राथमिक शिक्षणाद्वारेच भरला जातो. प्राथमिक शिक्षणाचे कार्य करणारा शिक्षक हा अध्यापक विद्यालयातून तयार होतो. प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणानंतर कनिष्ठ महाविद्यालयांना आजच्या काळात अतिशय महत्व आहे. या स्तरातून भविष्यकालीन भारताच्या सेवेसाठी डॉक्टर, अभियंता आणि शिक्षक तयार होत असतात. या काळातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होणे अतिशय आवश्यक असते कारण हा काळ वादळी अशांततेचा/कुमार अवस्थेचा काळ असतो. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन होणे आवश्यक असते. हे मार्गदर्शन करण्याचे कार्य शिक्षक करीत असतो. हा काळ पौगंडावस्थेचा असतो. या काळात विद्यार्थ्याने लावला तर झेंडा नाहीतर टेंबाच! हा कालखंड जीवनाचा राजमार्ग असतो. विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य प्राथमिक शिक्षक करत असतो. अध्यापक विद्यालयातून प्राथमिक शिक्षक तयार होतात. त्यासाठीच अध्यापक विद्यालयांचे प्रशासन ही अत्यंत महत्वाची बाब आहे. ह्या विद्यालयांचे प्रशासन करीत असताना प्रशासकीय अधिका-याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या प्रशिक्षण स्तरांवर अनेक समस्या आहेत. याला अनुसरून ज्या मार्गावर आज संशोधनाची आवश्यकता वाटते असे कांही घटक संशोधकाने येथे नमूद केलेले आहेत.

१. **"महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास"**

बारावी (विज्ञान) शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेश मिळतो. या महाविद्यालयातून देशाचे भावी डॉक्टर तयार केले जातात. यामध्ये अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. या वैद्यकीय महाविद्यालयात प्रशासकीय कामकाजामध्ये येणा-या समस्यांचा अभ्यास करणे व समस्यांवर उपाय सूचविणे संशोधकास आवश्यक वाटते.

२. **" सैनिकी विद्यालयांच्या व्यवस्थापनामध्ये येणा-या समस्यांचा अभ्यास"**

कोणतीही संस्था व्यवस्थितपणे चालविण्यासाठी त्या दृष्टीने संस्थेचे व्यवस्थापन चांगले असणे आवश्यक असते. ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया अआहे. शिक्षण हे अतिशय गतिमान व संवेदनशील असे क्षेत्र आहे. बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत असतात व त्यानुसार शिक्षण संस्थांना बदल करावे लागतात. असे बदल घडवून आणताना शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनात अनेक समस्या येत असतात. सैनिक विद्यालयांना मिळणा-या तुटपुंज्या अनुदानामुळे शाळांच्या गरजा भागत नाहीत. अशा स्थितीत व्यवस्थापनामध्ये अनेक समस्या, अडचणी निर्माण होतात. व्यवस्थापनामध्ये केवळ शैक्षणिक बाबींकडे लक्ष देऊन चालत नाही तर इतर आर्थिक, तांत्रिक व सामाजिक बाबीही सांभाळाव्या लागतात. यासर्व बाबींकडे कुशलतेने लक्ष द्यावे लागते व अशा वेळी अनेक समस्या व्यवस्थापनामध्ये येतात.

सैनिकी विद्यालयांची पार्श्वभूमी (आर्थिक, तांत्रिक व सामाजिक) लक्षात घेता या विद्यालयांच्या व्यवस्थापनात कोणत्या समस्या येतात हे जाणून घेणे व त्यावर उपाययोजना करणे आवश्वक वाटते. म्हणून सैनिकी विद्यालयांच्या व्यवस्थापनामध्ये येणा-या समस्यांचा अभ्यास करणे संशोधकास आवश्यक वाटते.

३. **"महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास."**

उच्च माध्यमिक (विज्ञान) शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेश मिळतो. या अभियांत्रिकी महाविद्यालयातून देशाचे भावी अभियंता तयार केले जातात. यामध्ये अनुदानित व विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. या विनाअनुदानित अभियांत्रिकी

महाविद्यालयात प्रशासकीय कामकाजामध्ये येणा-या समस्यांचा अभ्यास करणे व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्रशासकीय समस्यांवर उपाय सुचविणे हे संशोधन संशोधकास आवश्यक वाटते.